# प्रेस नोट

## हडपसर पोलीसांकडुन पुणे शहर व पुणे शहर लगतचे परिसरातुन वाहन चोरी करणाऱ्या आरोपीस अटक करुन ०७ वाहने हस्तगत

पुणे शहरातील दुचाकी व चारचाकी वाहन चोरीस व घरफोडी चोरीच्या गुन्हयास प्रतिबंध करुन, चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरीता मा. शशिकांत शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त सो। उत्तर प्रादेशिक विभाग पुणे व मा. दिपक साकोरे, पोलीस उप आयुक्त सो, परि-४ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या विशेष मोहिमे अंतर्गत मा. समिर शेख, सहाय्यक पोलीस आयुक्त सो, वानवडी विभाग पुणे, मा. विष्णु पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, हडपसर पोलीस ठाणे पुणे, अंजुम बागवान, पोलीस निरीक्षक (गुन्हे), यांचे सुचनानुसार हडपसर पोलीस स्टेशनच्या हददीत विशेष मोहिम राबविण्यात येत होती.

फिर्यादी विकी रमेश आलकुंटे, वय २४ वर्षे, धंदा मजुरी, रा. सं.न.१०६, शंकरमठ, आलकुंटे वस्ती, हडपसर, पुणे यांनी त्यांची होंन्डा युनिकॉर्न मो.सा. नं. एम.एच.१२, के.डब्ल्यु. ७१२१ हि वैभवी हॉस्पीटल, हडपसर आकाशवाणी, हडपसर, पुणे समोर पार्क करुन लॉक करुन ठेवली असताना ती कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या समंतीशिवाय मुददाम लबाडीच्या इरादयाने नेलेबाबत फिर्याद दाखल करण्यात आली होती. हडपसर पोलीस स्टेशनच्या तपास पथकाने लागलीच तपासाचे चक्रे वेगाने फिरवुन तपास पथकातील पो. शि. ८६९२ अकबर शेख यांना मिळालेल्या गोपनीय माहिती नुसार विधीसंघर्षित बालक वय १७ वर्षे, रा. मुळगांव- मु.थोटेवाडी, पोस्ट- दुरगांव, ता.कर्जत, जि. अहमदनगर, व आरोपी २) नानासाहेब भारत माने, वय २८ वर्षे रा. कवीटगांव, वडारी गल्ली, पोस्ट- सांगवी, ता.करमाळा, जि. सोलापुर यांना अटक करुन त्यांचे ताब्यातुन **दाखल गुन्हयातील चोरीस गेलेली मोटर सायकल हस्तगत केली.**

तसेच दाखल गुन्हयात ताब्यात असलेला विधी संघर्षग्रस्त बालकाला विश्वासात घेवुन त्याचेकडे तपास करुन त्याचेकडून **पुणे शहर व पुणे शहर लगतचे परिसरातुन चोरलेल्या ०६ मोटर सायकली व दाखल गुन्हयातील चोरीस गेलेली मोटर सायकल अशा** एकुण **०७** मोटर सायकली विधीसंघर्षित बालकाकडून हस्तगत करण्यात आल्या आहे. तपासादरम्यान हडपसर पोलीस स्टेशन कडील वाहनचोरीचे ०२ गुन्हे, चंदननगर पो.स्टे. कडील ०१ गुन्हा, वानवडी पो.स्टे. ०१ गुन्हा, यवत पो.स्टे., पुणे ग्रामीण कडील ०१ गुन्हा असे वाहनचोरीचे गुन्हे उघड करण्यात पोलीसांना यश आले आहे. एकुण २,३५,०००/- रु. किंमतीच्या मोटार सायकली जप्त करण्यात आलेल्या आहेत.

तपास पथकातील सहा. पोलीस निरीक्षक, संदिप नारायण देशमाने, सहा. पोलीस निरीक्षक हेमंत चंद्रकांत पाटील, पोलीस उप निरीक्षक सोमनाथ शेंडगे, पोलीस हवालदार युसुफ पठाण, संपत औचरे, राजेश नवले, पो.ना. सैदोबा भोजराव, राजु वेंगरे, प्रमोद टिळेकर, प्रताप गायकवाड, विनोद शिवले, गणेश दळवी पो. शि. अकबर शेख यांनी वरील कामगीरी केली.